# पदभरती निवेदन
# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत **महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर एन.यु.एच. एम.** कार्यक्रमधील **Paediatrician, Full Time Medical Officer, Part Time Medical Officer,** संवर्गातील रिक्त पदांची, कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत. सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती हया महानगरपालिकेच्या संकेतस्थळ (www.chhsambhajinagarmc.org) वर प्रसिध्द करण्यात आलेले असून, उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना Download करुन, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज समक्ष सादर करावा करिता या निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

मा.आयुक्त तथा महोद्‌य
यांची मान्यता दिनांक ०७.०७.२०२५

Digitally signed by
PARAS HARAKCHAND MANDLECHA
Date: 02-04-2026 13:47:17

वैदयकीय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# जाहिरात नमुना सन २०२५-२६

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

### छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

### छत्रपती संभाजीनगर शहर महानगरपालिका

| अ.क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रति महा एकत्रित मानधन | आवश्यक अनुभव | नियुक्तीचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Paediatrician | ०१ | MBBS MD Paed/ MBBS DCH/ MBBS DNB with MMC Registration & with Renewal | वयाच्या ७० वर्षापर्यंत | 75000/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | NUHM | EWS-01 |
| ०२ | Full Time Medical Officer | ०१ | MBBS,with MMC Registration & with Renewal | वयाच्या ७० वर्षापर्यंत | 60000/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | NUHM | NTB-01 |
| ०३ | Part Time Medical Officer | १३ | MBBS with MMC Registration & with Renewal | वयाच्या ७० वर्षापर्यंत | 30000/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | NUHM | आरक्षण लागु नाही |

महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद रिक्त पदांकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर रिक्त पदे Paediatrician, Full Time Medical Officer,Part Time Medical Officer करीता दि 09/ 04 /२०२६ सकाळी 11 ते 03 वाजेपर्यंत डाटा सेंटर सिटी मार्बल बिल्डींग निराला बाजार छत्रपती संभाजीनगर येथे थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहेत.

**अटी व शर्ती -**

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवांरासाठी रु ५०० /- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी २५०/-धनाकर्ष (Demand Draft ) जोडणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष (Demand Draft ) Aurangabad City Urban Health Society Municipal Corporation, Aurangabad या नावाने काढावा. धनाकर्ष (Demand Draft ) राष्ट्रीयकृत बँकेचा आसावा.

२) ६० वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्यचिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. शासकिय कर्मचारी यांच्यावर पुर्विच्या शासकिय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्ह्याची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

३) उपरोक्त नमुद केलेले पद २९ जुन २०२६ पर्यंत कंत्राटी तत्वावर कराराद्वारे भरण्यात येत आहे. सन २०२५-२६ च्या कृती आराखडयामध्ये सदरच पदाची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

४) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

५) सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण/२४५६४-७७४/१६ दि. २०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

६) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७) सर्व पदांसाठी उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे,तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, संबधीत पदाकरिताच्या शैक्षणिक अर्हतेचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणी नुतनीकरण प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणूण (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसाक्षांकित) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

८) अर्जदारांने यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम केले असल्यास परंतू त्याच्यांवर प्रशासकीय कारवाई करुन त्यांना कामावरुन कमी केले असल्यास अशा उमेदवारांना या कार्यालयात अर्ज करता येणार नाही.

९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) <u>उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.</u>

११) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१२) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४) राखीव प्रवर्गातील उमेदवारानी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल.

१५) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१७) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात येवुन, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१८) अर्जदारांनी एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र धनाकर्ष असणे आवश्यक आहे.

१९) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापणाचा नमुना स्वसांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

२०) अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवाराची पात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रीयेत करण्यात येईल. तथापी अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रीयेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या पदाकरीता पात्र आहे असा होणार नाही. निवड प्रक्रीये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडी नंतर अर्ज विहीत अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी व / वा निवड तात्काळ रदद करण्यात येईल.

२१) पदभरती बाबत पात्र अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणी पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या मनपा संकेत स्थळावर (www.chhsambhajinagarmc.org)प्रकाशीत

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

करण्यात येईल. या करिता वेळोवेळी संकेतस्थळी भेट देणे देखील बंधनकारक आहे. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तीक संपर्क साधण्यात येणार नाही.

२२) अर्ज भरत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचुकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबधीत संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणीत करुन घ्यावे व त्याची स्वाक्षांकीत प्रत आपण मुलाखतीस पात्र झाल्यास कागदपत्र छाननी दरम्यान सादर करावे.

२३)अर्ज करीत असलेल्या पदाकरिता विहीत केलेली शैक्षणीक अर्हता व अतिरीक्त आवश्यक शैक्षणीक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राहय धरण्यात येईल. शैक्षणीक अर्हता धारण करण्यापुर्वीचा अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये त्याची दखल घेतली जाणार नाही.तसेच अनुभवाचा तपशील नमुद करतांना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा व अनुभव प्रमाणपत्रासोबत सदरच्या नियुक्ती आदेश जोडण्यात यावेत.

२४)ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्या पदाकरिता आवश्यक असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल.

२५)ज्या पदाकरिता Council Registration आवश्यक आहे,अशा पदाकरिता अर्ज दाखल करताना Council Registration Certificate देणे अनिवार्य आहे.तरच संबंधित उमेद्वाराला पात्र करण्यात येईल.Council Registration करिता पावती गृहीत धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२६) सदर निवड मेरीट बेसीसवर करण्यात येणार आहे.

२७) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी कंत्राटी पदावरील केलेली वैदयकीय सेवा ही बंधपत्रित सेवा म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

२८) सदर पदभरतीच्या अनुषंगाने निवड समितीवर कुठल्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आल्यास त्या उमेदवारास अपात्र ठरवीण्यात येईल तसेच पदभरती बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेले आहेत.

मा.आयुक्त तथा महोदय
यांची मान्यता दिनांक ०७.०७.२०२५

Digitally signed by
PARAS HARAKCHAND MANDLECHA
Date: 06-04-2026 13:34:24

वैदयकीय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र:-

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वता: साक्षांकित करुन लावावे करावा |
|---|

प्रति,
मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर.

पदाचे नाव:----------------------------------

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :---------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :---------------------------------------------

३) जन्म तारीख:-वर्ष ............. महिना ............. दिवस ...........

अक्षरी----------------------------------------------------------------------
----

वय :- .......... वर्ष पुर्ण, ............महिने, ........ दिवस (जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :-

--------------------------------------------------

--------------------------------------------------

--------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ..............................................)(नमुद करणे अनिवार्य)
(ई मेल ID.:- ...............................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे:- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :-होय/नाही जातीचा प्रवर्ग :------------------

जातीचे नाव :------------------

➢ अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :------------------(नमुद करणे अनिवार्य)



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

७)धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम :-

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही:-आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०)अनुभव :-अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेलया कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११)अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.(सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)....................................... २).......................................

३)....................................... ४).......................................

५)....................................... ६).......................................

७)....................................... ८).......................................

९)....................................... १०).......................................

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- ........................... स्वाक्षरी :- .......................................

दिनांक :- / /२०२६ अर्जदारांचे नांव:-------------------------

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापणाचा नमुना

### प्रतिज्ञापन

### नमुना- अ

(नियम ४ पहा)

मीश्री/श्रीमती/कुमारी ........................................................................................
श्री. ........................................................................ यांचा/यांची
मुलगा/मुलगी/पत्नी, वय ......... वर्ष, राहणार ..........................................................
..........................................................................................................................
याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ........................................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी)

**ठिकाण :-**

**दिनांक :-** / /

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner